IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

IJARSCT
Impact Factor: 6.252

Volume 2, Issue 1, August 2022

# बुद्धाचा निसर्गवाद तोच विज्ञानवाद – एक विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. बनसोडे पंढरी सोपानराव**
संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे विभाग
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावनाः**

गौतम बुद्धांनी सांगितलेला धम्ममार्ग बुद्धाचा निसर्गवाद हाच खरा विज्ञानवाद संपूर्ण आयुष्यभर निसर्गाच्या प्रयोगशाळेत तथागत फिरले त्यांना असे आढळून आले की निसर्ग हा माणसांत भेद का कधीच करत नाही तर माणूस हा उच्च, नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री–पुरुष, जात, धर्म , पंथ इत्यादीच्या नावे भेद करत असतो. नदी सगळ्यांनाच पाणी देते डोंगर वृक्ष हा सर्वांनाच छाया देतो. हाच निसर्गवाद असून बुद्धांचा खरा विज्ञानवाद आहे.

नद्या समुद्रात विलीन होता तसे वर्ण संघात विलीन होतात.[1] भिक्खुनों गंगा, यमुना, अचिरवती, (सरभू) (शरयू) ब्राह्मण क्षत्रिय, वेश्य, शुद्र या चार वर्णातील उपदेशिलेल्या धम्मविनयामध्ये प्रवेश करतात तेव्हा पूर्वीची नावे व गोत्रे यांचा त्याग करतात आणि शाक्यपुत्र श्रमण हीच संज्ञा प्राप्त करतात.[2] माणसे कर्म, विद्या, धम्म, शील आणि उत्तम जीवन यांनी शुद्ध होताच गोत्राने वा धनाने नव्हे.

जन्माने कोणी ब्राह्मण वा शुद्र होत नाही तर कर्मा नेच होतो हा विचार तथागतांनी वारं वार मांडल्याचे दिसते याचे एक फार चांगले उदाहरण सिद्धार्थ गौतमांना अनेक प्रयोगानंतर बोधी प्राप्त झाली या प्रक्रियेत त्यांना जी सत्ये गवसली त्यांचा धम्म बनला लोकांच्या कल्याणासाठी हा धम्म लोकांपर्यंत पोचविण्यासाठी त्यांनी जे माध्यम निर्माण केले ते माध्यम म्हणजे संघ होय तो कसर तर होत गेल्या त्याचे स्वरूप काय होते इत्यादी बाबींचे येथे काही विवेचन करण्यासं घाची निमिती करणे हे त्यांच्या दृष्टेपणाचे ऐतिहासिक कार्य क्षेत्र बाबी प्राप्त करणे हे जितके महत्त्वाचे आणि त्या बोधीला सुस्पष्ट धम्माचे स्वरूप देणे.

## 1. भिक्खुसंघाची निर्मितीः

बोधी प्राप्त केल्यानंतर तथागत सुमारे सात आठवडे उरूवेलाच्या परिसरातच चिंतन करीत होते एके दिवशी ते राजायतन वृक्षाखाली बसलेले असताना उत्कल (ओरिसा) देशातून आले ले तपुस्स आणि भवनिक हे दोन व्यापारी तेथे आले. तथागतांना मह्वा आणि लाडू नेऊन दया म्हणणे दीर्घ काळापर्यंत तुमचे कल्याण होईल.[3]

## 2. संघाचा विस्तारः

पुढच्या काळात वाराणसीतील एका व्यापाऱ्याचा मुलगा यश हा उपसंपदा प्राप्त करून भिक्खू बनला, त्यानंतर त्याचे वाराणसीतील चारमित्र आणि त्याहीनंतर त्याचे आणखी पन्नास भिक्खू बनले.

## 3. उपासकः

याच काळात यशाचे वडील उपासक बनले आता संघ तयार झाला असल्यामुळे ते त्रिशरणाचा उच्चार करणारे पहिले उपासक होत. त्यानंतर यशाची आई आणि भिक्खू होण्यापू र्वीची त्याची पत्नी या दोघी उपासिका बनल्या. त्रिशरणाचा उच्चार करणाऱ्या या पहिल्या उपासिका होत बुद्धधम्म आणि संघ यांना जो अनुसरतो तो बौद्ध उपासक असे स्थूलमानाने म्हणता येईल.

सारे जग चक्राप्रमाणे परिभ्रमण करीत आहे हा संसार केवळ निःसार आहे अखिल प्राणी बऱ्यावाईट कर्माच्या योगाने उच्चनीच स्थिती प्रत जातात जे सत्कर्म करितात ते सद्गती पावतात आणि जो दुष्कर्मे करितात

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
IJARSCT
Impact Factor: 6.252
Volume 2, Issue 1, August 2022

ते दुर्गती पावतात या जगामध्ये जो नानाविध विपत्ती व पीडा दृष्टीस पडते ती सारी पूर्वकर्माचे फल होय. कर्म प्रवृत्तीच्या व वासनामू लक बंधनाच्या योगाने प्राण्यास पुनः पुन्हा जन्म व मरण ही प्राप्त होतात.[4]

**3. प्रेम आणि मैत्रीचा कल्याणकारी मार्ग:**

1) बोधीवृक्षापासून जवळच निरंजना नदी वाहत होती. गौतम बु द्ध दररोज निरंजना नदीवर स्नान करण्यासाठी जात असत. गौतम बुद्धांच्या स्वतःच्याच चालण्यामुळे बनलेल्या मार्गाने चालीत ध्यान करीत असत कधी–कधी ते वाहणाऱ्या नदीच्या तटावर तर कधी बोधीवृक्षाखाली बसून समाधी लावीत बोधी वृक्षावर हजारो पक्षी आपला कलख करीत असत. गौतम बुद्धांना आपल्या वचनाचे स्मरण झालेत्यांना आठवले की त्यांनी कपीलवस्तूला जायला पाहिजे तेथे कितीतरी लोक त्यांच्या सदधम्म मार्गाचा शोध लावण्याची बातमी मिळावी याची प्रतिक्षा करीत असतील.

2) गौतम बुद्धासाठी नदी, आकाश, चंद्र, वारे, पर्वत, वन, गवताचे एकेक पान आणि मातीचा एके ककण परिवर्तीत झाले होते. त्यांना समजत होते की सदधम्माचा मार्ग शोधण्यातच त्यांना बराच काळ निघून गेला पण तो व्यर्थ गेला नाही. बऱ्याचशा परीक्षा अडचणीमुळेच ते आपल्या ऱ्हदयात सद्धम्म मार्गा चे रहस्य शोधण्यात सफल झाले.

3). उरुवेला गावचे बालक–बालिका बहुतेक गौतम बुद्धांना भेटण्यासाठी येत असत मुक्त चेनेच्या मार्गाला स्वाभाविक भाषेत दुसऱ्यांना समजावून सांगणे संभव आहे. खेड्यातील निघून बालक, ज्यांना कधी शाळेत जाण्याची संधी मिळाली नाही, ते देखील त्यांची शिकवण समजू शकत होते. यामुळे गौतम बुद्धांना प्रोत्साहन मिळाले.

4) जेव्हा पृथ्वीवर, ना मनुष्य होता, ना पक्षी, ना सस्तनप्राणी त्यावेळी समुद्रामध्ये केवळ प्राणी वनस्पती, वृक्ष आणि हिरवळ पृथ्वीवर होती. त्या काळी आपण सर्व दगड ओस आणि रोपट्यांच्या स्वरूपात होतो. आपण पक्षी सर्व प्रकारचे प्राणी शेवटी मनुष्याचे रूपात आलो यावेळी आपण साधारण मानवाच्या स्थितीपेक्षा वरच्या स्तरावर आहोत.

**5) बौद्ध धम्माचे अधिष्ठान :**

जे साराला सार आणि असाराला असार समजतात ते सम्यक संकल्पयुक्त सारप्राप्त करतात.(धम्मपद, 12)

1) भगवान बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाल्यामुळे त्याने नवा जीवनमार्ग शोधून काढला.

2) बुद्धाने प्रतिपादन केलेला जीवनमार्ग यालाच बौद्ध धम्म म्हणतात.

3) हा जीवनमार्ग तीन गोष्टीवर अधिष्ठित आहे 1) अनित्य, 2) दुःख, 3) अनात्म

4) अनित्य : यापैकी पहिले अधिष्ठान 'अनित्य' आहे बुद्ध म्हणतो, मनुष्यप्राणी (आणि प्रत्येक वस्तू) जीवनाच्या कोणत्याही क्षणी तीच असू शकत नाही.

5) याचा अर्थ माणसाला दु :ख असले तरी त्याच्या दु :खाचे परिमार्जन करता येते. दुःख नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हे धम्माचे पहिले अधिष्ठान आहे.

6) दुःखयापैकी दुसरे अधिष्ठान दुःख आहे बुद्ध म्हणतो मनुष्य प्राणी दुःखात, दैन्यात, दारिद्र्यात रहात आहे हे त्याचे दुसरे तत्त्व होय.

7) सर्व जेव्हा दुःखाने भरलेले आहे याचा अर्थ दुःखाचे अस्तित्व मान्य करणे हे दुसरे धम्माचे अधिष्ठान आहे.

8) अनात्म : यापैकी तिसरे अधिष्ठान अनात्म आहे. बुद्ध म्हणतो, आपला जो मार्ग आहे त्याचा ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही संबं ध नाही त्याचा मरणोत्तर जीवन व कर्म कां डाशी संबंध नाही.

9) इहलोकातील माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हाच धम्माचा केंद्रबिंदू आहे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Volume 2, Issue 1, August 2022
Impact Factor: 6.252

10) अनित्य, दुःख आणि अनात्मती बाबींवर अधिष्ठीत आहे. दुःख म्हणजे प्रपंच दुःखमय आहेअनात्म म्हणजे जगामध्ये आत्मा नावाची काही बाब नाही जग हे कर्मानुसार चालते अशा यथार्थ ज्ञानाला सम्यक दृष्टी असे म्हणतात.

### 6) मध्यम मार्ग :

1) बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर त्यांनी सारनाथ ये थे पहिले प्रवचन दिले.
2) त्या प्रवचनात बुद्धाने 'मध्यम मार्ग ' प्रतिपादन केला यालाच 'मज्झिम प्रतिपद' असेही म्हणतात .
3) बुद्ध म्हणतात, जीवनाची आत्यं तिक दोन टोके आहेत एक सुखोपभोगाचे व दुसरे आत्मक्लेशाचे.
4) एक टोक म्हणजे कामवासनेची घृष्णा आणि विषयासक्तीत सतत व्यस्त असणे हा तृप्ती मिळविण्याचा हलक्या दर्जाचा रानटीपणाचा अयोग्य हानिकारक असा उपाय आहे.
5) दुसरे टोक म्हणजे तपश्चर्या किंवा आत्मक्लेश हा मार्गही दुःखकारक, अयोग्य, अपायकारक असा आहे.
6) एक म्हणतो, खा, प्या, मजा करा कारण उदया आपण मरणारच आहोत, दुसरा म्हणतो सर्व वासना मारून टाका कारण त्या पुनर्जन्माचे मूळ आहेत.
7) हे दोन्ही मार्ग माणसाला न शोभण्यासारखे आहेत म्हणून बुद्धाने ते नाकारले बुद्ध म्हणतात, ''ही दोन्ही टोके आत्यतिक आहेत हे टाळता येतात असा एक मध्यममार्ग आहे.
8) चैनीचा उपभोग घेत पडणे हा एक अंत आणि देह–दंडण करणे हा दुसरा अंत, या दोन्ही अंताला न जाता तथागताने मध्यम मार्ग शोधून काढला तथागताने शोधून काढले ला मार्ग ज्याच्यायोगे निब्बाणाची प्राप्ती होते.
9) व्यक्ती आणि मसाज यांच्या सम्यक समन्वय साधून व्यक्तिविकासास पूर्ण स्वातंत्र्य देऊन समाज सुसंस्कृत बनविण्याचा मार्ग म्हणजे भगवान बुद्धांचा मार्ग होय.[5]

### 7) मानवाच्या विवे कबु द्धीला केवळ बुद्धाने जाणले :

भगवान बुद्धाचा जन्म, बुद्धत्वप्राप्ती आणि परिनिर्वाण या तिन्ही गोष्टी महत्त्वपूर्ण घटना वैशाख पौर्णिमेलाच झालेल्या त्यामुळे हा दिवस विशेषत्वाने साजारा के ला जातो. 1955 साली 6 मे या दिवशी वैशाख पौर्णिमा होती. डॉ. बाबासाहेब आंबे डकरांनी हा दिवस निवडला सोपारा येथील बुद्ध अवशेष प्राप्त केले त्या ठिकाणी जाण्याचे ठरविले बुद्धांनी सांगितलेला धर्म सोडला तर सर्वच धर्माची उभारणी देव आणि आत्मा या जोडीवर करण्यात आला आहे. आत्मा ईश्वरात विलीन होतो. असा काल्पनिक आधार देव आणि आत्मायांची बैठक पक्की करण्यासाठी दिलेला आहे भगवतांनी धर्म सांगताना मी तो सां गतो म्हणून स्वीकारा असे म्हणून विवेकबुद्धीला आवाहन केले आहे. बौद्ध धर्म हा चिकित्सेनंतर सांगितलेला धर्म आहे रोगनिदानानंतर दिलेले औषध आहेजगात दुःख आणि दारिद्र्या हे महाभयंकर रोग आहे. जो धर्म दुःख आणि दारिद्र्या दूर करू शकला नसेल तो धर्मच होऊ शकणार नाही कारण धर्म हा समाज धारणेसाठी आहे.[6]

### 8) प्रज्ञा म्हणजे बुद्धीप्रामाण्यवाद :

बुद्धी, ज्ञान आणि प्रज्ञा एकमेकांच्या जवळ असले तरी याची प्रकृती भिन्न–भिन्न आहे, बुद्धी बुद्धिजीवी बुद्धीवाद असे शब्द आपण किती सहजतेन वापरतो मनुष्याची योग्यता बुद्धिनेच मापली जाते. सामान्यापेक्षा वेगळा विचार मां डणारा बुद्धित्वादी ठरतो. प्रशसिला जातो चौर्यकर्म करणाराही बुद्धिकोशल्याचा वापर करतो आणि पाळीव प्राणीसुद्धा बुद्धीचा वापर करतोच की बुद्धी उपजत असते असं नाही म्हणता येणार! ज्योतिबा फुले म्हणाले होते की, बुद्धिमत्ताही पिढी जाद नाही की वंशपरंपरागत ती प्रयास आणि साक्षेपान साह्य होते.[7]

**निष्कर्ष :**

1) बुद्धाचा निसर्गावाद तोच खरा विज्ञानवाद असून निसर्गाची निर्मिती म्हणजे विद्वान असून मानव लहानपणापासून वृ द्धत्वापर्यंतचा प्रवास विज्ञानवाद आहे असे बुद्ध म्हणतात.
2) बुद्धांने सांगितले ते सारे विज्ञानावर आधारित होते. आणि वास्तविकतेच्या जवळ जाणारे होतेसृष्टीतील प्रत्येक वस्तू क्षयशील आहे ती एक दिवस नष्ट होणार आहे.
3) माणूस जे काही कर्म करतो तो त्याच्या वर्तमानातील वाटचालीचे आणि भूतकाळाचे फलित असते जे आपण पहातो तेच निर्मित करतो.
4) बुद्धांने जो निसर्गातील घडणाऱ्या घटनाक्रम आहे. तो वैज्ञानिक कार्य कारण भावावर अवलंबून असे.
5) अनित्यता हा जो सिद्धांत मांडला तो वैज्ञानिक दृष्टिकोनातून मां डला असून जागतिक पातळीवरच्या पहिला वैज्ञानिक बुद्धच मानला आहे समारोप :

बुद्धाचा निसर्ग वाद हाच मानवी संघर्षाचा स्थायीभाव असून निसर्ग हाच खरा मार्गदाता आहे तोच आपणास वै ज्ञानिक भाव काय असतो तो सांगत आहे. माणसांचे वर्तन हे चिरंतन बदलत रहावे दुःखाचे कारण तृष्णा असून ती सजीव सृष्टीवरील प्रत्येक मानवांत, प्राण्यांत, आढळून येत असते विज्ञानवादी धम्माचा शोध तथागतांनी लावला असे म्हणण्याचे कारण पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या सखोल अभ्यासातून उदभवलेला आहे ज्या स्वाभाविक प्रवृत्तीत मनुष्य जन्म घेतो त्यांचा क्रिया प्रक्रिया आणि इतिहास व परंपरा ह्यांच्यामुळे त्यांना मिळाले ले इष्ठनिष्ठ वळण ह्यांच्या संशोधनाचा परिणाम म्हणजे बुद्धधम्म तथागत हे केवळ मार्गदाते आहे. मोक्ष हा ज्याचा त्याने आपल्या श्रमाने मिळवायचा आहे.[7]

**संदर्भग्रंथ सूची :**

1) विनयपीटक–चूळपग्ग – कदन्ततिस्स वंश सुगत प्रकाशन, नागपूर
2) सर्वो त्तम भूमिपुत्र – गोतम बुद्ध – डॉ. सांळूखे आ. ह. लोकायत प्रकाशन सातारा, 2007
3) गौतम बुद्धाचे चरित्र – कृष्णाजी अर्जुन कदम के कुस्कर गुरजी, (संपादक), डॉ. सारनाथ सौंदडकर, प्रकाशक सारनाथ प्रकाशन, परभणी 2013
4) करूणा गौतम बुद्धांची – डांगे दिवाकर छण्क्ण्भ्ण पब्लिकेशन्स, नागपूर, 2012, पृ. क्र. 12
5) धम्मपद – डॉ. कौसल्यायन आनंद भदन्त बुद्धभूमि प्रकाशन, नागपूर, 2014.6) धम्मसिद्धान्त – डॉ. डहाट धनराज – संकेत प्रकाशन, नागपूर
7) धम्मसूर्य तथागताचे आदर्श विचार – कांबळे सम्राट, नेहा प्रकाशन, नागपूर, 2015